आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

११ मे २०२४ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार समाप्त, येत्या सोमवारी मतदान
- चौथ्या टप्प्यात राज्यातल्या ११ मतदारसंघात २ कोटी २८ लाख मतदार २९८ उमेदवारांचं भवितव्य ठरवणार
- देशाला विश्वगुरू बनवण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज असल्याने भाजपच्या मागे खंबीरपणे उभे राहण्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं मतदारांना आवाहन
- प्रधानमंत्री केवळ मतांसाठी आश्वासनं देत असून त्यांचा जनसामान्यांशी संपर्क तुटला असल्याची काँग्रेस महासचिव प्रियंका गाधी यांची प्रचारसभेत टीका
- देशाच्या औद्योगिक उत्पादनात गेल्या मार्च महिन्यात चार पूर्णांक नऊ दशांश टक्के वाढ

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याचा प्रचार आज थांबला. आजच्या अखेरच्या दिवशी सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार प्रचार केला. या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, सोमवारी १३ मे रोजी मतदान होणार आहे. या अकरा मतदारसंघांत एकूण २९८ उमेदवार नशीब

आजमावत असून, एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्र आहेत. सर्वाधिक ४१ उमेदवार बीडमध्ये तर सर्वात कमी ११ नंदुरबारमध्ये आहेत. या टप्प्यात २ कोटी २८ लाखांहून अधिक मतदारांची नोंद झाली असून सर्वाधिक २५ लाख ८५ हजार मावळमध्ये तर सर्वात कमी १६ लाख ७७ हजार शिर्डीमध्ये आहेत.

या टप्प्यात रिंगणात असलेल्या महत्त्वाच्या उमेदवारांमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, राज्य सरकारमधले मंत्री संदीपान भुमरे, पंकजा मुंडे, चंद्रकांत खैरे, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, वसंत मोरे यांच्यासह विद्यमान खासदार हीना गावित, रक्षा खडसे, इम्तियाज जलील, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, सुजय विखे-पाटील, सदाशिव लोखंडे यांच्यासारखे अनेक उमेदवार रिंगणात आहेत.

**<><><><><>**

दरम्यान या टप्प्यातल्या मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणेची तयारी सुरु आहे. या टप्प्यात ११ मतदार संघातले२ कोटी २८ लाख मतदार २९८ उमेदवारांचं भवितव्य ठरवतील. त्याकरता एकूण २३ हजार २८४ मतदान केंद्र असून मतदारांसाठी विविध सुविधा उपलब्ध असतील. या ११ मतदारसंघात राज्य शासनानं मतदानाच्या दिवशी सुटी जाहीर केली आहे.जे मतदार कामासाठी मतदार संघांच्या बाहेर असतील, त्यांना तसंच राज्य आणि केंद्र शासन, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम आणि इतर प्रतिष्ठान आदींना ही सार्वजनिक सुटी लागू राहील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश बदलत आहे. देशाची अर्थव्यवस्था भक्कम करून देशाला विश्वगुरू बनवण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज आहे म्हणून भाजपच्या मागे खंबीरपणे उभे राहा असं आवाहन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी

महायुतीचे पुण्यातील उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी नातूबाग मैदानावर आयोजित जाहीर सभेत आज केलं. काँग्रेसकडे विकासाचा कोणताही मुद्दा नाही. त्यामुळे भाजपला संविधान बदलायचे आहे असा अपप्रचार त्यांनी चालू केला आहे, जातीचं राजकारण करायला सुरुवात केली आहे, अशी टीका गडकरी यांनी केली.

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी केवळ मतांसाठी आश्वासन देत असल्याचा आरोप काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी आज नंदुरबारमधल्या सभेत केला. राजकीय फायद्यासाठी नरेंद्र मोदी छान छान गोष्टी सांगतात. मात्र सर्वसामान्यांशी त्यांचा संपर्क तुटल्याचा दावा प्रियंका यांनी या भाषणात केला.

**<><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज पुण्यातल्या जाहीर सभेत बोलताना लोकशाही टिकवायची असेल तर नेहरू आणि गांधींचे विचार भक्कम करायला पाहिजे असं सांगितलं. शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉक्टर अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ हडपसर इथं आयोजित जाहीर सभेमध्ये ते बोलत होते. पूर्वी निवडणुका दोन ते तीन टप्प्यांमध्ये होत होत्या मात्र आता सहा ते सात टप्प्यांमध्ये निवडणुका होत आहेत. ही बाब निवडणूक आयोगावर संशय निर्माण करणारी असल्याचंही पवार म्हणाले.

**<><><><>**

सामाजिक कार्यकर्ते डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्ये प्रकरणी विशेष न्यायालयानं दिलेल्या निकालावर अपील करण्याचा निर्णय राज्याचा न्याय आणि कायदा विभाग घेईल, असं उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं आहे.

पुण्यात श्रमिक पत्रकारसंघातर्फे आयोजित कार्यक्रमात आज  ते बोलत होते.विरोधी पक्षाचे नेते आपली भूमिका निभवायला तयार नाहीत असंही ते म्हणाले.  आपल्या नेत्यात क्षमता नाही हे काँग्रेसला माहीत होतं. तरीही त्याच नेत्याला त्यांनी प्रत्येकवेळी लॉन्च केलं, असा दावा त्यांनी केला.  लोकशाहीला वाचवण्यासाठी ही निवडणूक आहे असे मत काँग्रेसचे नेते अभिषेक मनू संघवी यांनी आज पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीनं आयोजित वार्तालाप कार्यक्रमात व्यक्त केलं. जे सरकार २७२संख्येमध्ये होणार आहे त्यांना ४०० पार कशासाठी हवे आहेत, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

**<><><><>**

निवडणुकीच्या पुढच्या टप्प्यातल्या प्रचारानेही वेग घेतला आहे. उत्तर मुंबई इथं पायाभूत आणि आरोग्य सेवांवर भर देत अनेक अद्ययावत सुविधा दिल्या जाणार असल्याचं आश्वासन महायुतीचे उमेदवार पीयूष गोयल यांनी दिलं. कांदिवलीमधल्या गौतम नगर इथून जन आशीर्वाद रथासह सुरू झालेल्या नमो यात्रेत नागरिक सहभागी झाले होते.

**<><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘ठाणे’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. हे बातमीपत्र संपल्यावर सव्वा सात ते साडे सात या वेळेत  आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><>**

देशाच्या औद्योगिक उत्पादनात गेल्या मार्चमधे चार पूर्णांक नऊ दशांश वाढ झाली आहे. ही वाढ मागच्या वर्षाच्या याच महिन्यापेक्षा जास्त असली तरी या

वर्षाच्या फेब्रुवारी महिन्यातल्या वाढीपेक्षा कमी आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात औद्योगिक उत्पादनातली वाढ पाच पूर्णांक आठ दशांश नोंदवली गेली आहे. या आकडेवारीनुसार मार्च महिन्यात खाणकामात एक पूर्णांक दोन टक्क्यांनी तर पूर्ण आर्थिक वर्षात साडे सात टक्क्यांनी घट झाली. तर वीजनिर्मितीत मार्च महिन्यात आठ पूर्णांक सहा दशांश आणि पूर्ण आर्थिक वर्षात सात पूर्णांक एक दशांश वाढ झाली.

**<><><><>**

परकीय गुंतवणूकदारांनी मे महिन्यात सतरा हजार कोटींची गुंतवणूक भारतीय बाजारातून काढून घेतली आहे. परकीय गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर बाजारात एक लाख आठ हजार कोटींचे समभाग खरेदी केले होते, तर १० मे पर्यंत एक लाख २६ हजार कोटींच्या समभागाची विक्री केली. असं नॅशनल सिक्युरिटी डिपॉझिटरी लिमिटेडच्या आकडेवारीत सांगण्यात आलं आहे.

**<><><><>**

निवडणुकीच्या प्रत्येक टप्प्यानंतर सरासरी मतदानाची आकडेवारी जाहीर करण्यासाठी निवडणूक आयोगाने अवलंबलेल्या पद्धतीवर काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आक्षेप घेतला आहे. प्रत्यक्ष मिळालेल्या मतांची पूर्ण आकडेवारी प्रसिद्ध करावी असं, त्यांनी निवडणूक आयोगाला लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

**<><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकता नाईट रायडर्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. कोलकत्यातल्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर पावसामुळे खेळाला विलंब होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात विविध ठिकाणी आज जोरदार पाऊस झाला.

**बीड** जिल्ह्यात अंबाजोगाई शहरासह काही भागात वीजांच्या कडकडाटासह पावसानं जोरदार हजेरी लावली आहे. गेल्या तीन चार दिवसांपासून उकड्यामुळे हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

**सांगली**, **मिरज** शहर आणि ग्रामीण भागात ही जोरदार वादळी पाऊस झाला. अचानक पडलेल्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडं उन्मळून पडली आहेत.

**अहमदनगर** जिल्ह्यात श्रीगोंदा तालुक्यात जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यात इतर भागात ढगाळ वातावरण होतं.

**सातारा** शहर आणि परिसरात वादळी वारे, विजांच्या कडकडाटासह आज दुपारी पावसानं जोरदार हजेरी लावली.

**<><><><><>**

कोकणांत काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ आणि सोसाट्याचा वारा आणि हलका पाऊस पडण्याची शक्यता आहे. नाशिक, अहमदनगर, पुणे, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यांत तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटांसह, वादळ आणि सोसाट्याच्या वाऱ्याची शक्यता असून हवामान विभागानं या जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट दिला आहे. विदर्भात अमरावती, अकोला, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम, यवतमाळ आणि उस्मानाबाद, लातूर, नांदेड, बीड, औरंगाबाद, सोलापूर, सांगली या जिल्ह्यांना विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता असून या जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे.

**//<><><><><>//**